MHBH050007762023

संं.फौ.मु.क्र. ३९८/२०२३
सरकार -वि- अमीत मेश्राम
निशाणी क्रमांक ०९ खाली

# न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी लाखांदुर यांचे न्यायालय
## (पिठासीन अधिकारीः प्रविण पी. यादव)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३९८/२०२३** **निशाणी क्र. ०९ खाली**

गुन्हा क्रमांक २९०/२०२३, कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९
पोलीस स्टेशन लाखांदुर.

**अभियोगपक्ष** : **महाराष्ट्र शासन,**
तर्फे पोलिस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन लाखांदुर,
ता. लाखांदुर, जि. भंडारा.

**सरकार पक्षातर्फे** : सौ. एस. सी. बुराडे, सहा.सरकारी वकिल

**आरोपी** : **अमीत गोकुळ मेश्राम,**
वय २८ वर्षे, धंदा- मजुरी,
राह. – मोहरना,
ता. लाखांदुर, जि. भंडारा.

**आरोपीतर्फे** : श्री. जे. डी. राऊत, विधीज्ञ.

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०८.०९.२०२३ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ०८.०९.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २९.१२.२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०९.०२.२०२४ |
| पुरावा सुरु झाला ती तारीख | २१.०३.२०२५ |
| प्रकरण न्यायानिर्णयाकरीता ठेवली ती तारीख | ०२.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२.०६.२०२६ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | निरंक |

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ सी. आर. पी. सी. प्रमाणे सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमीत गोकुळ मेश्राम | ०८/०९/२०२३ सुचनापत्रावर सोडले | २९/१२/२०२३ | ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९. | निर्दोष | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अ.क्र | नांव | स्वरुप |
|---|---|---|
| ०१. | निलेश भाऊराव बोरकर, सरकारी साक्षीदार क्र. १ | घटनास्थळ व जप्ती पंच |

## बचाव पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नांव | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्यायलयातर्फे घेण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नांव | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्षातर्फे कागदोपत्री पुरावा

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | स्वरुप |
|---|---|---|
| ०१ | निशाणी क्र. पी- १२ | सुचनापत्र |
| ०२ | निशाणी क्र. पी- १३ | घटनास्थळ पंचनामा |
| ०३ | निशाणी क्र. पी- १४ | जप्ती पंचनामा |

## बचाव पक्षातर्फे कागदोपत्री पुरावा

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्यायलयातर्फे दस्तऐवजांना देण्यात आलेल्या निशाणी क्रमांक

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## गुन्ह्यात वापरलेली वस्तु

| अनुक्रमांक | वस्तु | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्यायनिर्णय
## (दिनांक ०२ जुन, २०२६ रोजी पारीत)

१. आरोपी **अमीत गोकुळ मेश्राम** यांच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अंतर्गतची प्रस्तुत संपरीक्षा आहे.

२. अपराधाच्या तपशिलानुषंगाने आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच साक्षदार क्रमांक १ नामे निलेश भाऊराव बोरकर यांची साक्ष नोंदविली.

३. अभिलेखावर उपस्थित पुराव्यावरुन व कागदपत्रावरुन खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरीता उद्भवले असून मी त्यावर सकारण निष्कर्ष नोंदविले आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक ०८/०९/२०२३ रोजी २०.३० वाजताच्या सुमारास मौजा मोहरणा, ता. लाखांदुर, जि. भंडारा येथे आरोपी त्याच्या ताब्यात प्रत्येकी ९० मि.ली. नी भरलेल्या टायगर ब्रँड देशी दारु बॅच नं. १२३ ऑगस्ट २३ चे ३१ नग प्लास्टीकचे पव्वे विना परवाना अवैद्यरित्या बाळगुन विक्री करतांना मिळून आला आणि त्यावरुन आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये दंडनिय अपराध केला ? | **नाही.** |
| २) | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**०४.** निशाणी क्र. १ वरील दि. ०५/०५/२०२५ रोजीचे आदेशानुसार सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. आरोपीने त्याच्या बचावा करीता एकही साक्षीदार तपासलेला नाही.

**मुद्दा क्रमांक १ च्या अनुषंगानेः-**

**०५.** अभियोग पक्षाने पंच साक्षदार क्रमांक १ नामे निलेश भाऊराव बोरकर (सा.क्र. १) यांची साक्ष नोंदवीली आहे. पंच साक्षदार क्रमांक १ नामे निलेश भाऊराव बोरकर (सा.क्र. १) यांनी त्यांच्या पुराव्यात पोलीसांनी त्यांना दिनांक ०९/१०/२०२३ रोजी मच्छी बाजार चौक, मोहरणा येथे सुचनापत्र नि.क्र. १२ देऊन बोलावले होते असे कथन केले. त्यांनी सुचनापत्रावरील त्यांची

सही ओळखली व त्यातील मजकुर बरोबर असल्याचे कथन केले. पुढे त्यांनी असे कथन केले की, ते तेथे गेले तेव्हा तेथे पोलीस व आरोपी उपस्थित होते. ते तेथे गेल्यानंतर तेथे पंचनामा करण्यात आला. पुढे त्यांनी असे कथन केले की, आरोपीकडे एक पिशवी होती ज्यामध्ये ३१ नग दारुच्या बाटल्या होत्या. त्यांना त्याचे झाकण फोडुन दाखवले, वास दिला त्यावेळेस ती दारु आहे असे लक्षात आले. त्यानंतर सीलबंद करुन पंचनामा करण्यात आला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १३ व जप्ती पंचनामा नि.क्र. १४ वरील त्यांच्या सह्या ओळखल्या व त्यातील मजकुर बरोबर असल्याचे कथन केले. त्यांचेसोबत दुसरे पंच म्हणुन पोलीस पाटील सुभाष राऊत हे होते असे देखील त्यांनी कथन केले.

**०६.** पंच साक्षदार क्रमांक १ नामे निलेश भाऊराव बोरकर (सा.क्र. १) यांनी त्यांच्या उलटतपासात घटनास्थळाच्या चतुसिमेमध्ये पुर्वेस वसंत उके यांची शेती, पश्चिमेस एन.टी. समाजाचे मंदीर, दक्षिणेस वैनगंगा नदी व उत्तरेस बाजार चौक असल्याचे कथन केले. ते मोहरना गावचे सरपंच आहे ही बाब त्यांनी मान्य केली. पो.हवा. सतीश सिंगणजुडे हे त्यांच्या ओळखीचे आहेत ही बाब देखील त्यांनी मान्य केली. त्यांच्याच सांगण्यावरुन त्यांनी पंचनाम्यावर सह्या केल्या ही बाब देखील त्यांनी मान्य केली. पंचनामा ग्रापंचायतमध्ये तयार केला ही बाब त्यांनी मान्य केली. पंचनामा त्यावेळेस त्यांनी पुर्ण वाचुन पाहीला नव्हता ही बाब त्यांनी मान्य केली. पंचनाम्यामध्ये संपुर्ण काय लिहीले आहे हे त्यांना अचुक सांगता येणार नाही ही बाब देखील त्यांनी मान्य केली. विचारलेल्या इतर उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिली.

**०७.** पंच साक्षदार क्रमांक १ नामे निलेश भाऊराव बोरकर (सा.क्र. १) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की ते मोहरना गावचे सरपंच असल्याचे त्यांनी मान्य केले तसेच पो.हवा. सतीश सिंगणजुडे हे त्यांच्या ओळखीचे आहेत ही बाब देखील मान्य केली. त्यांच्याच सांगण्यावरुन त्यांनी पंचनाम्यावर सह्या केल्या ही बाब देखील त्यांनी मान्य केली. पंचनामा त्यावेळेस त्यांनी पुर्ण वाचुन पाहीला नव्हता ही बाब त्यांनी मान्य केली. तसेच त्यांनी

पंचनाम्यातील मजकुर देखील त्यांना सांगता येणार नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनाम्यामधील मजकुर सिध्द झाले नाही. सरकार पक्षाने पंच साक्षदार क्रमांक १ नामे निलेश भाऊराव बोरकर (सा.क्र. १) यांचेव्यतीरिक्त इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही.

०८. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाने सदर प्रकरणातील फिर्यादी व तपासीक अंमलदार यांचा पुरावा वारंवार संधी देऊन देखील नोंदविलेला नाही. त्यामुळे आरोपीवर ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द होईल असा पुरेसा पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेला नसल्यामुळे दिनांक ०८/०९/२०२३ रोजी २०.३० वाजताच्या सुमारास मौजा मोहरणा येथे आरोपी त्यांचे ताब्यात ९० एम.एल. नी भरलेले ३१ नग प्लास्टीकचे देशी दारुचे पव्वे विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगतांना मिळुन आला, ही बाब अभियोग पक्षाने सर्व संशयापलिकडे सिध्द केलेली नाही. त्यामुळे उपलब्ध पुराव्यावरून आरोपी विरूध्द ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द झालेला नाही. त्यामुळे मी **मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगानेः-</u>**

०९. मुद्दा क्रमांक १ ला नोंदविण्यात आलेल्या निष्कर्षाच्या अनुषंगाने, आरोपीविरुध्द लावण्यात आलेले आरोप संशयापलीकडे सिध्द न झाल्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी **अमीत गोकुळ मेश्राम** यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) च्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपीचे जुने बंधपत्र व जामिनपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ कलम ४८१ प्रमाणे रक्कम रुपये १५०००/- चे बंधपत्र द्यावे. सदरचे बंधपत्र पुढील ६ महीन्यांकरीता कार्यान्वीत असेल व त्यानंतर ते रद्द समजले जाईल.

**४.** गुन्ह्यात जप्त मुद्देमाल हे अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क साकोली येथे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवण्यात यावे

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAVIN PRABHULAL YADAV
Date: 2026.06.02 15:51:16 +0530

दिनांकः ०२/०६/२०२६

**(श्री. प्रविण पी. यादव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग लाखांदुर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment .

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | H. R. Puri |
| Name of the Court | : | J.M.F.C., Lakhandur. |
| Date of Judgment | : | 02/06/2026 |
| Judgment Signed By P.O. | : | 02/06/2026 |
| Judgment Upload on | : | 02/06/2026 |